RNI No.-49985/91

सर्वमंगल माङ्गल्ये शिवे सर्वार्थसाधिके । शरण्ये त्र्यंबके गौरि नारायणि नमोऽस्तु ते ।।

संस्थापक डी. एन. शिर्के यांचे सर्वाधिक लोकप्रिय प्रकाशन || श्री गुरुदेव दत्तात्रेय प्रसन्न || पुणे व सातारा आवृत्ती

✲ || श्री महालक्ष्मी प्रसन्न || ✲

शास्त्रशुध्द संपूर्ण वार्षिक पंचांग

श्री महालक्ष्मी®

सरस्वती पब्लिशिंग कंपनी प्रा.लि.,कोल्हापूर
www.mahalaxmipanchang.com

१ जानेवारी २०२५

पौष–माघ
श्री शालिवाहन शके १९४६

विक्रम संवत् २०८१
शिवशक ३५१

सौर शिशिर ऋतू
उत्तरायण

राहू काल

- रविवार – सायं.४.३० ते ६.००
- सोमवार – सकाळी ७.३० ते ९.००
- मंगळवार – दुपारी ३.०० ते ४.३०
- बुधवार – दुपारी १२.०० ते १.३०
- गुरुवार – दुपारी १.३० ते ३.००
- शुक्रवार – सकाळी १०.३० ते १२.००
- शनिवार – सकाळी ९.०० ते १०.३०

गोव्यातील उत्सव

दि.४
श्री महामायादेवी जत्रा नेत्रावळी–नुने

दि.४ ते ८
शांतादुर्गा कुंकळ्ळीकरीण जत्रोत्सव फातर्पा–केपे

दि.११
शांतादुर्गा चामुंडेश्वरी कुडतरी महामाया जत्रा अवेडे–केंपे

दि.१२
श्री बोडगेश्वर जत्रा म्हापसा

दि.१३
देवकी–कृष्ण जत्रा माशेल, घुडो–अवेडे जत्रा

वार					
रवि	(राहू काल)	पौष शु.६ पूर्वा भाद्रपदा **५** बांगर षष्ठी परमहंस श्री योगानंद जन्मदिन श्री तुकारामबाबा जोशी जयंती मसोबादेव यात्रा प्रारंभ जवळा ता.सांगोला, त्रिंबक अण्णा म. पु.ति.कंदर ता.करमाळा मु.४	पौष शु.१४ मृग **१२** राजमाता जिजाऊ जयंती स्वामी विवेकानंद जयंती पौर्णिमा उ.रात्री ५.०२ नंतर श्री सिध्देश्वर यात्रा प्रारंभ सोलापूर(४ दिवस) मु.११	पौष कृ.५ उत्तरा फाल्गुनी **१९** कोटणीस महाराज पुण्यतिथी सांगली, कुंभायन उ.रा.१.२९ अमृत सायं.५.२९ नं. मु.१८	पौष कृ.१२ ज्येष्ठा **२६** प्रजासत्ताक दिन श्री वीरभद्र जत्रा हुमणाबाद संगोळी रायण्णा पुण्यदिन गगनगिरी महा.निर्वाण दिन गगनबावडा कोल्हापूर मु.२५
सोम	(गोव्यातील उत्सव)	पौष शु.७ उत्तरा भाद्रपदा **६** पत्रकार दिन गुरू गोविंदसिंह जयंती स्वामी स्वानंदगिरी पुण्यतिथी मुक्काम खेर्डी ता.चिपळूण श्री खंडोबा यात्रा करंजे ता.खानापूर जि.सांगली मु.५	पौष शु.१५ आर्द्रा **१३** भोगी धनुर्मास समाप्ती शाकंभरी पौर्णिमा उ.रात्री ३.५६ पर्यंत, माघ स्नानारंभ कुलधर्म, रेणुका यात्रा सौंदत्ती यमाई यात्रा औंध जि.सातारा काळुबाई यात्रा मांढरगाव मु.१२	पौष कृ.६ हस्त **२०** श्री भालचंद्र महाराज जयंती कणकवली, विश्वनाथ महा. पुण्यतिथी बेलापूर नवी मुंबई जननी कुंबळजादेवी यात्रा देवसरे ता.महाबळेश्वर मु.१९	पौष कृ.१३ मूळ **२७** सोमप्रदोष शिवरात्री, मेरू त्रयोदशी(जैन) श्री यल्लमादेवी यात्रा आरग ता.मिरज जि.सांगली मु.२६
मंगळ	(गोव्यातील उत्सव)	पौष शु.८ रेवती **७** दुर्गाष्टमी श्री शाकंभरीदेवी नवरात्रारंभ विष्णुदास कवी पु.ति.माहुर सोमजाई जाखमाता प्रतिष्ठान दिन फळसप ता.म्हसळा पंचक सायं.५.४९ पर्यंत मु.६	पौष कृ.१ पुनर्वसु **१४** मकर संक्रांती सूर्याचा मकर राशी प्रवेश स.८.५४ पुण्यकाल स.८.५४ ते सायं.४.५४ मराठा शौर्य दिवस बसताडा पानिपत,भगवानबाबा पु.ति. राजा भगीरथ जयंती मु.१३	पौष कृ.७ चित्रा **२१** कालाष्टमी भारतीय माघ मासारंभ स्वामी विवेकानंद जयंती(तिथी) गुळवणी महाराज पुण्यतिथी सांगली,श्री यल्लमादेवी यात्रा मणेराजुरी ता.तासगाव मु.२०	पौष कृ.१४ पूर्वाषाढा **२८** अमावास्या रात्री ७.३६ नं. संत तुकाविप्र समाधी दिन अंजनवती जि.बीड शब–ए–मेराज मु.२७
बुध	पौष शु.२ उत्तराषाढा **१** नूतन वर्षाभिनंदन श्री नृसिंह सरस्वती जयंती चंद्रदर्शन जमादिलाखर मु.३०	पौष शु.९ अश्विनी **८** कैवल्याश्रमस्वामी पुण्यतिथी शिवडाव ता.कणकवली मु.७	पौष कृ.२ पुष्य **१५** सेना दिन किंक्रांत,करिदिन जडीबसवलिंगेश्वर महास्वामी रथ केसरजवळगा ता.उमरगा श्री खंडोबा यात्रा कोरठण पिंपळगाव रोठा(पारनेर) मु.१४	पौष कृ.८ स्वाती **२२** जडीबसवलिंगेश्वर महास्वामी पु.ति.केसरजवळगा ता.उमरगा मु.२१	पौष कृ.३० उत्तराषाढा/श्रवण **२९** कुंभ मेळा प्रयाग क्षेत्री दर्श मौनी अमावास्या सायं. ६.०५ प., गणेश पालखी यात्रा प्रा.चिंचवड जि.पुणे, कोपेश्वर यात्रा खिद्रापूर ता.शिरोळ मु.२८
गुरु	पौष शु.३ श्रवण **२** कर्मवीर विठ्ठल रामजी शिंदे पुण्यदिन, श्री ज्ञानगिरीस्वामी पुण्यतिथी मिरज अजमेर उरूस प्रा. रज्जब मु.१	पौष शु.१० भरणी **९** श्री कोणजाईदेवी यात्रा तळा ता.माणगाव जि.रायगड मु.८	पौष कृ.३ आश्लेषा **१६** छत्रपती संभाजीराजे राज्याभिषेक दिन महादेव गोविंद रानडे पुण्यदिन शिरगाव उरूस ता.तासगाव मु.१५	पौष कृ.९ विशाखा **२३** नेताजी जयंती श्री बाळासाहेब ठाकरे जयंती श्रवणेर्कः उ.रात्री ४.४४ मु.२२	माघ शु.१ धनिष्ठा चंद्रदर्शन **३०** महात्मा गांधी पुण्यदिन रामरथ मिरवणूक नागठाणे जि. सातारा, कृष्णामाई उत्सव वाई ओमशक्तिबाबा पु.ति.भुलेश्वर यवत ता.दौंड रज्जब मु.२९
शुक्र	पौष शु.४ धनिष्ठा **३** महिला मुक्तिदिन, ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले जयंती विनायक चतुर्थी, यल्लमादेवी यात्रा सावळज ता.तासगाव पंचक स.१०.४७ नंतर मु.२	पौष शु.११ कृत्तिका **१०** पुत्रदा एकादशी उत्तराषाढार्कः उ.रात्री २.२१ श्री दासगणू महाराज जयंती गोरटा जि.नांदेड विश्व हिंदी दिन मु.९	पौष कृ.४ मघा **१७** संकष्ट चतुर्थी चंद्रो.रात्री ९.२७ संत ताजुद्दिनबाबा जन्मदिन नागपूर, तळेश्वर यात्रा तळदेव ता.महाबळेश्वर, तात्या महा. पु.ति.दहीवडी ता.माण मु.१६	पौष कृ.१० अनुराधा **२४** राष्ट्रीय बालिका दिन आनंदमूर्ती पादुका स्थापना दिन अंधेरी मुंबई, घबाड सकाळी ७.१६ ते रात्री ७.२४ प. मु.२३	माघ शु.२ शततारका **३१** धर्मनाथ बीज अवतार मेहेरबाबा अमरतिथी गोविंद म.उपळेकर जयंती फलटण मोसेवाडी यात्रा ता.खेड जि.पुणे श्री महालक्ष्मी सायं.किरणोत्सव प्रारंभ कोल्हापूर शाबान मु.१
शनि	पौष शु.५ शततारका **४** सांबस्वामी सलगर महाराज पुण्यतिथी कुर्डुवाडी मु.३	पौष शु.१२/१३ रोहिणी २ रा शनि **११** शनिप्रदोष खंडोबा यात्रा पाल जि. सातारा, मोराळे व पाचवड ता.खटाव,थापलिंग ता.आंबेगाव राष्ट्रीय रस्ते सुरक्षा सप्ताह प्रा. कालरात्री नवरात्रारंभ मु.१०	पौष कृ.५ पूर्वा फाल्गुनी **१८** संत जळोजी–मळोजी सुतार महाराज पुण्यतिथी पंढरपूर श्री धुंडा महाराज देगलूरकर पुण्यतिथी पंढरपूर मु.१७	पौष कृ.११ ज्येष्ठा ४ था शनि **२५** षट्तिला एकादशी संत निवृत्तीनाथ यात्रा त्र्यंबकेश्वर, पर्यटन दिन ह.मीरासाहेब उरूस मिरज राष्ट्रीय मतदार दिन मु.२४	या महिन्यातील यात्रा, जयंती, पुण्यतिथी, उत्सव इ.माहिती या महिन्याचे मागे पहा वास्तू मुहूर्त–दि.१,२,१०, दि.२०,२२,३१ जावळ मुहूर्त–दि.२,३,८, दि.१२,२०,२२,३१

राशिभविष्य

मेष – प्रशिक्षणासाठी परदेशगमन घडेल. विवाह जुळेल. नोकरी–धंद्यात एक पाऊल पुढे राहील. आरोग्य चांगले राहील. शैक्षणिक प्रगती होईल. कायमस्वरूपी नोकरी लागेल. धार्मिक कार्यासाठी खर्च होईल. कायदेशीर बाबी सांभाळा. चंद्रबल– ९, १२, १३ १९

वृषभ – उद्योगधंद्यात मंदी, नोकरीत कष्ट, सामाजिक कार्यात सहभाग राहील. खर्च वाढेल. विवाह जुळेल. कर्माला भाग्याची जोड लाभेल. परदेशगमनाची संधी लाभेल. धार्मिक कामासाठी खर्च होईल. चंद्रबल– १०, ११, १४, १५, १६

मिथुन – धंद्यात मंदी राहील. बुध्दिकौशल्याने लाभ होईल. कायदेशीर बाबी सांभाळा. वडील, भावंडांना कष्ट होतील. मुत्सद्दीपणा कामाला येईल. इतरांना दुखवू नका. परदेशगमन घडेल. धार्मिक कामासाठी खर्च होईल. चंद्रबल– ९, १०, १२, १३, १७, १८

कर्क – धंद्यातील गुंतवणुकीचे अंदाज चुकतील. आर्थिक प्राप्ती चांगली राहील. पूर्वार्धात कामात यश मिळेल. विवाह जुळेल. उत्तरार्धात अहंकार वाढेल. भावनिक वादळात अडकाल. परदेशगमन घडेल. शिक्षणात यश मिळेल. चंद्रबल– ८, ९, १०, ११, १४, १५

सिंह – आत्मविश्वास, संततीवर प्रेम राहील. उत्तरार्धात बुध्दिकौशल्याने कामात यश मिळेल. गुणवत्ता वाढवा. सामाजिक कामातून कमी श्रमात लाभ होतील, पण कीर्ती कमी मिळेल. मातृपितृसुखास अनिष्ट राहील. चंद्रबल– १०, ११, १२, १३, १७, १८

कन्या – घरगृहस्थीची चिंता राहील. विवाह, शिक्षण, परदेशगमन आध्यात्मिक प्रगतीस उत्तम काळ. संततीची उधळपट्टी चालू राहील. भावनिक वादळे निर्माण होतील. प्रयत्न तोकडे पडतील. नवीन संस्था स्थापन कराल. चंद्रबल– १२, १३, १४, १५, १९

तूळ – पूर्वार्धात कामात यश मिळेल. घरगृहस्थीची काळजी घ्या. भावनिकता आवरा. खर्च वाढेल. शारीरिक तक्रारींकडे लक्ष द्या. नातेवाइकांची ये–जा वाढेल. हट्टीपणा सोडा. विपरीत घटनेतून लाभ संभवतो. चंद्रबल– ९, १४, १५, १६, १७, १८

वृश्चिक – आर्थिक प्राप्ती जेमतेम राहील. येणे वसूल होईल. उत्तरार्धात कामात यश मिळेल. प्रॉपर्टीची, शेतीची कामे होतील. महिलांना प्रसूतीसमयी त्रास संभवतो. प्रेमविवाहास अनुकूलता राहील. कलाक्षेत्रात पुढे रहाल. चंद्रबल– ८, ९, १०, ११, १७, १८

धनू – पुण्याई उपयोगाला येईल. नवीन कल्पना सुचतील. उत्तरार्धात आर्थिक प्राप्ती जेमतेम राहील. नवीन दर्जा मिळेल. नियोजन चांगले राहील. मानापमानाचे प्रसंग येतील. खर्च वाढेल. मनाची कुचंबणा होईल. भावनिक रहाल. चंद्रबल– १०, ११, १२, १३, १९

मकर – विपरीत घटनेतून लाभ संभवतो. आरोग्य सुधारेल. लेखन, प्रकाशन, कॉम्प्युटर, शिक्षण इ. क्षेत्रात प्रगतीचे मार्ग सापडतील. बोलण्यावर व क्रोधावर नियंत्रण ठेवा. विचार क्रांतिकारक ठरतील. त्वरित विवाह जुळेल. चंद्रबल– १२, १३, १४, १५, १६

कुंभ – नातेवाईक, आप्तेष्ट, मित्र व संततीसाठी खर्च कराल. निर्णायक कामात यश, पैसा मिळेल. कुटुंबात संमिश्र अनुभव येतील. विलंब, अडचणी, त्रास अनुभवाल. इतरांना दुखवू नका. संघर्षाला तोंड द्यावे लागेल. चंद्रबल– ८, ९, १५, १६, १७, १८

मीन – प्रगतीकारक महिना. यश, मोबदला मिळेल. खर्च वाढला तरी किफायतशीर कामासाठी होईल. विवाह जुळेल. जवळच्या व्यक्तींचा विरह जाणवेल. आनंदी रहाल. विलंब, अडचणी, त्रास अनुभवाल. प्रॉपर्टीची कामे होतील. चंद्रबल– १०, ११, १७, १८, १९

सूचना : दिनदर्शिकेमध्ये जास्तीतजास्त माहिती देण्याचा आम्ही नेहमीच प्रयत्न करीत असतो. अधिकाधिक माहिती छापून आणणेसाठी आमचेकडे अनेक निवेदने, ठराव वगैरे येत असतात. सबब सर्वच संतांचे वगैरे फोटो छापणेस आम्हास मर्यादा आहेत याची कृपया नोंद घ्यावी.

शुभ दिवस–दि.१,२ शुभ,दि.३ दु.१२.२५ प.शुभ,दि.४ मध्यम,दि.५ स.७.३१ नं.शुभ,दि.६ सायं.६.२३ प.शुभ,दि.७,८ शुभ,दि.९ दु.३.०७ प. शुभ,दि.१० दु.१.४५ प.शुभ,दि.१२ शुभ,दि.१४ मध्यम,दि.१६ दु.३.३९ प.शुभ,दि.१७,१९ शुभ,दि.२० स.९.५८ प.शुभ,दि.२१,२२ शुभ,दि.२४ मध्यम,दि.२६ स.८.२५ ते रा.८.५४ प.शुभ,दि.३० मध्यम,दि.३१ शुभ

त्याज्य दिवस–दि.११,१५, दि.१८,२५,२७,२८,२९

भूमिपूजन मुहूर्त–दि.१,२,८, दि.९,१०,१६,२०

साखरपुडा मुहूर्त–दि.१,२,३,६,७,८,१०,१२,१७,१९, दि.२०,२१,२२,२४,२६ उपनयन मुहूर्त–दि.३१
विवाह मुहूर्त–दि.१६,१७,१९,२१,२२,२६
मुहूर्त वेळा ऑक्टोबर महिन्याचे मागे पहा. सर्व हक्क प्रकाशकाच्या स्वाधीन

किंमत रु.६०.०० (१८% जी.एस.टी.सह)

आता श्री महालक्ष्मी दिनदर्शिका स्मार्ट फोनवरही उपलब्ध आहे.

|| श्री महालक्ष्मी दिनदर्शिका जिथे जिथे । साक्षात लक्ष्मी वसे तिथे ||

Premier Printers, Kolhapur. Ph.: 0231-2530325



श्रीमहालक्ष्मी®
info@mahalaxmipanchang.com

जानेवारी २०२५

सरस्वती पब्लिशिंग कंपनी प्रा.लि.
१२१७/२, ए वॉर्ड, शिवाजी पेठ,
कोल्हापूर. फोन : ०२३१-२५३०३२५

श्री लक्ष्मीव्रत असे करा



।। श्री लक्ष्मीव्रत कथा ।।

द्वापार युगातील गोष्ट. त्या काळी सौराष्ट्र देशामध्ये भद्रश्रवा नावाचा राजा राज्य करीत होता. तो मोठा विद्वान व वेदांत जाणणारा होता. त्याच्या राणीचे नाव सुरतचंद्रिका असे होते. त्यांना सात पुत्र व शामबाला नावाची एक कन्या होती. राजकन्या एके दिवशी आपल्या मैत्रिणींसह नगराबाहेरील उद्यानात विहार करीत असताना राजवाड्यामध्ये एक चमत्कारिक गोष्ट घडून आली. त्या दिवशी लक्ष्मीच्या मनात आले की, आपण राजवाड्यात जाऊन सुरतचंद्रिका राणीस प्रजेच्या कल्याणासाठी लक्ष्मीव्रताची आठवण करून द्यावी. त्यामुळे माझे वास्तव्य राजवाड्यात राहून राजाकडून प्रजेचे कल्याण होईल. अन्यथा मी सामान्य माणसाकडे वास केल्यास फक्त एकट्याचा फायदा होईल, म्हणून जनकल्याणार्थ राजवाड्यात राहणे बरे असा विचार करून लक्ष्मीने एका वृध्द स्त्रीचे रूप घेतले व काठी टेकीत ती राजवाड्याच्या मुख्य दरवाजापाशी आली तेव्हा तेथील द्वारपालाने लक्ष्मीला विचारले, ''आपणांस कोणास भेटावयाचे आहे?'' तेव्हा लक्ष्मीने सांगितले की, ''मला सुरतचंद्रिका राणीसाहेबांना भेटावयाचे आहे.'' द्वारपालाने लगेच राणीच्या एका दासीला बोलावून लक्ष्मीची भेट घालून दिली. दासीने अधिक चौकशी करण्याकरिता लक्ष्मीरूपातील वृध्द स्त्रीला प्रश्न विचारले, ''आपण कोण? आपले नाव काय? आपण कोठून आलात? आपले राणीसाहेबांकडे काय काम आहे?''

लक्ष्मीने दासीला सांगितले की, ''मी द्वारकेत राहणाऱ्या भुवनेश नावाच्या विद्वान ब्राह्मणाची पत्नी असून, माझे नाव कमला आहे. मी येथे येण्याचे कारण तुला थोडक्यात सांगते, ऐक!''

तुमची सुरतचंद्रिका राणी मागच्या जन्मी एका वैश्याची पत्नी होती. तो वैश्य दरिद्री होता, त्यामुळे नवरा-बायकोचे वारंवार तंटे होत असत. एके दिवशी भांडण करून ती घराबाहेर पडली व रडत भटकू लागली. ते पाहून मला तिची दया आली. मी तिची विचारपूस करून तिच्या दुःखाचे कारण ऐकले व तिचे दारिद्र्य दूर होण्यासाठी तिला लक्ष्मीव्रत करण्याचा उपदेश केला. लक्ष्मीव्रत कसे करावे याची तिला माहिती सांगितली. त्याप्रमाणे तिने लक्ष्मीव्रत केले. व्रताच्या प्रभावाने ती श्रीमंत व सुखी झाली. लक्ष्मी तिच्या घरी नांदू लागल्यामुळे त्या पती-पत्नीचा संसार सुखाचा झाला व पुढे पुष्कळ वर्षे त्यांनी ऐश्वर्य भोगले. पुढे त्यांना यथाकाल मृत्यू आला. लक्ष्मीव्रताच्या प्रभावाने त्यांना लक्ष्मी प्रसन्न झाल्यामुळे पुढील जन्म राजकुळात मिळाला. मागील जन्मी केलेल्या लक्ष्मीव्रताच्या प्रभावामुळे सुरतचंद्रिका राजघराण्यात सर्व ऐश्वर्य भोगत आहे; परंतु लक्ष्मीव्रताचा आता तिला विसर पडला आहे म्हणून सुरतचंद्रिकेस लक्ष्मीव्रताची आठवण करून देण्यासाठी मी येथे आले आहे.

हे सर्व त्या दासीने ऐकल्यावर तिला मोठे कौतुक वाटले. ती म्हणाली, ''आपण कृपाकरून लक्ष्मीव्रत केव्हा व कसे करावे, हे मला सांगाल काय? तेव्हा वृध्द स्त्रीरूपातील लक्ष्मी म्हणाली, ''ऐक, मार्गशीर्ष महिन्यातील प्रत्येक गुरुवारी सकाळी नदी किंवा विहिरीवर स्नान करून, पाच डहाळे काढून भरल्या कळशीत ठेवावेत. रांगोळी काढून पाट मांडावा व पाटावर साळी घालून त्यावर कळशी ठेवावी. कळशीमध्ये नाणे, सुपारी, मोती, पोवळे, दुर्वा घालाव्यात. जवळ समई लावावी. कळशीवर आठ बाजूला हळदीकुंकवाची बोटे ओढावीत. 'लक्ष्म्यै नमः' म्हणून पूजा करावी व तुपाचे निरांजन ओवाळावे. पिण्यासाठी वाटीमध्ये दूध ठेवावे व पुऱ्यालाडवाचा नैवेद्य दाखवावा. काही फळे ठेवावीत. पैसा, सुपारी, दक्षिणा, विडा ठेवावा आणि आई लक्ष्मी, अशीच येत जा, मुलाबाळांना सुखी ठेव, मला सौभाग्य दे, तुझी पूजा करून घे, सोन्याचांदीचा प्रकाश पडू दे, दूधदुभत्याची लयलूट होऊ दे, माझा नमस्कार तुला पोहोचू दे, तुझा आशीर्वाद मला मिळू दे. भरली घागर घरात राहू दे, तेलतुपाचा दिवा तुला दिसू दे, माझे बोल तू ऐकावे, तुझे बोल मी मानावे, हीच प्रार्थना. अशी मनोभावे प्रार्थना करावी. सायंकाळी गाईची पूजा करावी. तिला पुरणवरणाचा नैवेद्य दाखवावा आणि आपण व्रतस्थ रहावे. रात्री जागर करावा. उणेदुणे बोलू नये. सकाळी कळशीतील पाणी नदी किंवा विहिरीत सोडावे. पाच डहाळे पाच ठिकाणी टाकावेत आणि ज्या ठिकाणी पूजा केली असेल, त्या ठिकाणी हळदीकुंकू वाहावे. अशा तऱ्हेने मार्गशीर्ष महिन्यातील हे व्रत चार गुरुवारी करावे व आपल्या ऐपतीप्रमाणे दानधर्म करावा.

हे सर्व लक्षात घेऊन व्रत कर. तुझे कल्याण होईल व तुला कोणी भक्तीने विचारल्यास या व्रताची माहिती सांग. अभक्तीने विचारल्यास या व्रताची माहिती सांगू नकोस. दासीने हे सर्व मन लावून ऐकून घेतले व नंतर त्या वृध्द स्त्रीला म्हणाली, ''आजीबाई मी तुमचा बराच वेळ घेऊन तुम्हाला थांबविले, याबद्दल मला क्षमा करा. आत जाऊन राणीसाहेबांना तुम्ही आल्याचे सांगते.'' त्याप्रमाणे दासीने राणीवशात जाऊन एक वृध्द ब्राह्मण स्त्री भेटावयास आल्याचे राणीला सांगितले.

सुरतचंद्रिका राणीला वैभवाचा मोठा गर्व झाला होता; त्यामुळे तिला दासीचा निरोप आवडला नाही व उलट राग आला. राणी उद्दाम झाली होती. ती रागाने बाहेर आली व त्या वृध्द स्त्रीला म्हणाली, ''काय ग थेरडे, तू कशाला आलीस येथे? कुणी सोडले तुला येथवर? चल चालती हो येथून!''

लक्ष्मी म्हणाली, ''दुष्टे इतकी उन्मत्त कशाने झालीस? तुझे उद्दाम वर्तन पाहून मला क्षणभरही येथे रहावेसे वाटत नाही. आजचा दिवस लक्ष्मीचा असता तू माझी अवहेलना केलीस, त्याचे फळ तुला लवकरच मिळेल.'' असे म्हणून लक्ष्मी तेथून चालूही लागली. लक्ष्मी राजवाड्यातून रागाने बाहेर पडत असताना वाटेत शामबालेच्या दृष्टीस पडली. तेव्हा शामबालेने तिची आस्थेने विचारपूस केली. लक्ष्मीने राजवाड्यात घडलेली सर्व हकिकत तिला सांगितली, कारण शामबालेने तेथे राहू नये असे तिला वाटत होते. शामबालेने लक्ष्मीचे बोलणे शांतपणे व नम्रपणे ऐकून घेतले व त्याच दिवशी व्रतास आरंभ केला. मार्गशीर्ष महिन्यातील तो पहिलाच गुरुवार होता. लक्ष्मीच्या प्रसादाने शामबालेचा विवाह सिध्देश्वर नामक राजाच्या मालाधार नामक राजपुत्राशी झाला व शामबाला पतिगृही राजवैभवात नांदू लागली.

इकडे लक्ष्मीचा कोप होऊन भद्रश्रवा राजाचे राज्य लयास गेले. सर्व संपत्ती जाऊन राजा राज्यभ्रष्ट झाला. त्याचे सर्व वैभव जाऊन त्यास दरिद्री अवस्था प्राप्त झाली. राणीच्या आडमुठ्यां वागण्यामुळे राजकुमारही सोडून गेले. वेळेवर खाण्यास अन्न नाही, पांघरावयास वस्त्र नाही अशी स्थिती झाल्यामुळे राणीने आपल्या जावयाकडे जाऊन साहाय्य मागण्याची राजाला सूचना केली. राजा त्याप्रमाणे फिरत फिरत जावयाच्या राजधानीत आला व नदीकाठी विश्रांती घेत असता त्याला शामबालेच्या दासीने पाहिले व राजवाड्यात जाऊन शामबालेच्या कानावर घातले. ते ऐकून शामबालेने आपल्या वडिलांना वस्त्रे, भूषण व घोडा पाठवून मोठ्या आदराने बोलावून घेतले. त्यांचा आदर-सत्कार करून घरचे वर्तमान विचारले. सर्व ऐकून शामबालेस वाईट वाटले. शामबालेने पित्याचा चार दिवस पाहुणचार करून, द्रव्य देऊन निरोप दिला.

भद्रश्रवा राजा ते द्रव्यांचे भांडे घेऊन घरी गेला आणि त्याने सुरतचंद्रिकेस ते दाखविताच त्याचे कोळसे झाले. काही दिवसांनी सुरतचंद्रिका आपल्या लेकीकडे गेली. तो दिवस मार्गशीर्ष महिन्यातील चौथा गुरुवार होता. शामबाला नेहमीप्रमाणे लक्ष्मीव्रताच्या गडबडीत होती. पूजा आटोपून प्रार्थना करीत होती. राणीने ते पाहिले, तेव्हा त्या व्रताची तिला आठवण झाली. आपली चूक तिला कळली तिने लक्ष्मीची क्षमा मागितली व कळकळीने प्रार्थना करून तिने लक्ष्मीव्रतही केले व मुलीला घडलेली सर्व हकिकत सांगितली. मातृपितृभक्त मुलीला आपल्या आईवडिलांची दया आली. तिने आपल्या नवऱ्याला सांगून आपल्या बापाचे राज्य परत मिळवून दिले व आईला राजवाड्यात पोहोचविले. मग तिचे माऊही घरी परत आले. राणीने अत्यंत भक्तीने लक्ष्मीव्रताला सुरुवात केली. लक्ष्मी तिच्यावर पुन्हा प्रसन्न झाली व पूर्वीप्रमाणेच राज्यकारभार सुरू झाला.

ही कथा ऐकणाऱ्यांना, वाचणाऱ्यांना आणि व्रत करणाऱ्यांना सुखसमाधान आणि वैभव मिळेल. वैभव मिळाल्यावर उतू नये, गर्वाने सर्वांना तुच्छ लेखू नये, दानधर्म विसरू नये म्हणजे राजाराणी सुखी झाली तसे तुम्ही आम्ही सुखी होऊ.

• मकर संक्रांती •

।। श्री गणेशाय नमः ।।
।। श्री सरस्वत्यै नमः ।।

श्री शके १९४६ च्या मकर संक्रांतीचे फल – मंगळवार दि.१४ जानेवारी २०२५ म्हणजेच शके १९४६ पौष कृ.१ रोजी सकाळी ८.५४ वाजता सूर्य मकर राशीत प्रवेश करीत आहे.

संक्रांतीचा पुण्यकाल – मंगळवार दि.१४ जानेवारी २०२५ रोजी सकाळी ८.५४ पासून संध्याकाळी ४.५४ पर्यंत आहे.

सूर्याचे मकर संक्रमण बालव करणावर होत असल्याने वाहन वाघ असून उपवाहन घोडा आहे. तिने पिवळे वस्त्र परिधान केले असून हातात गदा घेतली आहे. केशराचा टिळा लावलेला आहे. वयाने कुमारी असून बसलेली आहे. वासाकरिता जाईचे फूल घेतलेले आहे. पायस भक्षण करीत आहे. सर्प जाति आहे. भूषणार्थ मोती धारण केले आहे. वारनांव व नाक्षत्रनांव महोदरी असून सामुदाय मुहूर्त ४५ आहेत. पूर्वेकडून पश्चिमेस जात आहे व वायव्य दिशेस पाहत आहे.

संक्रांतीचे फल – संक्रांतीने ज्या वस्तू परिधान केल्या आहेत त्या वस्तू महाग होतील. संक्रांती जेथून आली आहे तेथील जनतेला सुख प्राप्त होईल.

पर्वकालात द्यावयाचे दान – नवे भांडे, गाईला घास, अन्न, तिलपात्र, गूळ, तीळ, सोने, भूमी, गाय, वस्त्र, घोडा इत्यादी यथाशक्ती दाने द्यावीत.

किंक्रांत – करिदिन बुधवार दि.१५ जानेवारी २०२५ रोजी आहे.

संक्रांतीमध्ये वर्ज्य कर्मे – दात घासणे, कठोर बोलणे, वृक्ष-गवत तोडणे, गाई-म्हशींची धार काढणे व कामविषयक सेवन ही कामे करू नयेत.

जन्म नक्षत्रावरून संक्रांतीची शुभाशुभ फले

प्रवास	भोग	व्यथा	वस्त्रलाभ	द्रव्यनाश	विपुल धन
आर्द्रा	आश्लेषा-मघा	स्वाती	ज्येष्ठा-मूळ	शततारका	रेवती-अश्विनी
पुनर्वसु	पू.फाल्गुनी-उ.फाल्गुनी	विशाखा	पू.षाढा-उ.षाढा	पू.भाद्रपदा	भरणी-कृत्तिका
पुष्य	हस्त-चित्रा	अनुराधा	श्रवण-धनिष्ठा	उ.भाद्रपदा	रोहिणी-मृग

संकष्ट चतुर्थी
चंद्रोदय दि.१७ जानेवारी

				बारामती	०९.२३	रत्नागिरी	०९.३२	मार्गाव	०९.३०	बेंगलोर	०९.१४	बिदर	०९.११
				सातारा	०९.२७	चिपळूण	०९.२७	फोंडा	०९.३०	बेळगाव	०९.२९	कारवार	०९.३०
				कराड	०९.२८	राजापूर	०९.२८	पणजी	०९.३०	बागलकोट	०९.२१	हुबळी	०९.२५
मुंबई	०९.३२	पनवेल	०९.३१	कोल्हापूर	०९.२८	दापोली	०९.३२	छ.संभाजीनगर	०९.२२	गोकाक	०९.२५	धारवाड	०९.२५
ठाणे	०९.३१	पालघर	०९.३०	सांगली	०९.२४	सावंतवाडी	०९.२९	अहमदनगर	०९.२३	निपाणी	०९.२९	म्हैसूर	०९.१९
कल्याण	०९.३१	नाशिक	०९.२६	सोलापूर	०९.१९	कणकवली	०९.२९	धाराशिव	०९.१९	अथणी	०९.२४	हैद्राबाद	०९.१२
डोंबिवली	०९.३१	महाड	०९.३२	पंढरपूर	०९.२३	वेंगुर्ला	०९.२९	लातूर	०९.१५	मुधोळ	०९.२५	दिल्ली	०९.०६
अलिबाग	०९.३१	पुणे	०९.२७	मंगळवेढा	०९.२३	म्हापसा	०९.२९	नागपूर	०९.०५	विजयपूर	०९.२०	बडोदा	०९.२९

पंचांग
(मुंबई वेळेप्रमाणे)

जानेवारी २०२५ — पौष-माघ
श्री शालिवाहन शके १९४६ — विक्रम संवत् २०८१

ता.	वार	तिथी	ता.मि. पर्यंत	नक्षत्र	ता.मि. पर्यंत	योग	ता.मि. पर्यंत	करण	ता.मि. पर्यंत	चंद्रराशी	सूर्योदय	सूर्यास्त	भा.सौर दिनांक
जानेवारी		पौष											पौष
०१	बुध	शु.द्वितीया	२६.२४	उत्तराषाढा	२३.४५	व्याघात	१७.०६	बालव	१४.५५	मकर	०७.१४	१८.११	११
०२	गुरु	शु.तृतीया	२५.०८	श्रवण	२३.१०	हर्षण	१४.४७	तैतिल	१३.४८	मकर	०७.१४	१८.११	१२
०३	शुक्र	शु.चतुर्थी	२३.३९	धनिष्ठा	२२.२१	वज्र	१२.३६	वणिज	१२.२५	१०.४७ नं.कुंभ	०७.१५	१८.१२	१३
०४	शनि	शु.पंचमी	२२.०१	शततारका	२१.२३	सिध्दि	१०.०७	बव	१०.५१	कुंभ	०७.१५	१८.१३	१४
०५	रवि	शु.षष्ठी	२०.१५	पू.भाद्रपदा	२०.१७	व्यतिपात	०७.३१	कौलव	०९.०८	१४.३४ नं.मीन	०७.१५	१८.१३	१५
						वरियन	२८.५०						
०६	सोम	शु.सप्तमी	१८.२३	उ.भाद्रपदा	१९.०६	परिघ	२६.०४	गर	०७.२०	मीन	०७.१५	१८.१४	१६
								विष्टि	२९.२५				
०७	मंगळ	शु.अष्टमी	१६.२६	रेवती	१७.४९	शिव	२३.१५	बालव	२७.२६	मीन	०७.१६	१८.१४	१७
०८	बुध	शु.नवमी	१४.२६	अश्विनी	१६.२९	सिध्द	२०.२२	तैतिल	२५.२४	१७.४९ नं.मेष	०७.१६	१८.१५	१८
०९	गुरु	शु.दशमी	१२.२२	भरणी	१५.०६	साध्य	१७.२९	वणिज	२३.२१	मेष	०७.१६	१८.१६	१९
१०	शुक्र	शु.एकादशी	१०.१९	कृत्तिका	१३.४५	शुभ	१४.३६	बव	२१.२०	२०.४६ नं.वृषभ	०७.१६	१८.१६	२०
११	शनि	शु.द्वादशी	०८.२१	रोहिणी	१२.२९	शुक्ल	११.४८	कौलव	१९.२६	वृषभ	०७.१६	१८.१७	२१
		शु.त्रयोदशी	३०.३३										
१२	रवि	शु.चतुर्दशी	२९.०२	मृग	११.२४	ब्रह्मा	०९.०८	गर	१७.४६	२३.५५ नं.मिथुन	०७.१६	१८.१८	२२
						ऐंद्र	३०.४३						
१३	सोम	पौर्णिमा	२७.५६	आर्द्रा	१०.३०	वैधृति	२८.३८	विष्टि	१६.२६	मिथुन	०७.१७	१८.१८	२३
१४	मंगळ	कृ.प्रतिपदा	२७.२१	पुनर्वसु	१०.१६	विष्कंभ	२६.५७	बालव	१५.३४	२८.१८ नं.कर्क	०७.१७	१८.१९	२४
१५	बुध	कृ.द्वितीया	२७.२३	पुष्य	१०.२७	प्रीति	२५.४५	तैतिल	१५.१७	कर्क	०७.१७	१८.२०	२५
१६	गुरु	कृ.तृतीया	२८.०५	आश्लेषा	११.१५	आयुष्मान	२५.०४	वणिज	१५.३९	कर्क	०७.१७	१८.२०	२६
१७	शुक्र	कृ.चतुर्थी	२९.३०	मघा	१२.४४	सौभाग्य	२४.५५	बव	१६.४२	११.१५ नं.सिंह	०७.१७	१८.२१	२७
१८	शनि	कृ.पंचमी	अहोरात्र	पू.फाल्गुनी	१४.५०	शोभन	२५.१५	कौलव	१८.२५	सिंह	०७.१७	१८.२१	२८
१९	रवि	कृ.पंचमी	०७.३०	उ.फाल्गुनी	१७.२९	अतिगंड	२५.५६	गर	२०.४१	२१.२७ नं.कन्या	०७.१७	१८.२२	२९
२०	सोम	कृ.षष्ठी	०९.५८	हस्त	२०.२८	सुकर्मा	२६.५१	विष्टि	२३.१७	कन्या	०७.१७	१८.२३	३०
													माघ
२१	मंगळ	कृ.सप्तमी	१२.३९	चित्रा	२३.३५	धृति	२७.४८	बालव	२५.५९	कन्या	०७.१७	१८.२३	१
२२	बुध	कृ.अष्टमी	१५.१७	स्वाती	२६.३३	शूल	२८.३६	तैतिल	२८.३०	१०.०२ नं.तूळ	०७.१७	१८.२४	२
२३	गुरु	कृ.नवमी	१७.३६	विशाखा	२९.०७	गंड	२९.०५	वणिज	३०.३५	तूळ	०७.१७	१८.२५	३
२४	शुक्र	कृ.दशमी	१९.२४	अनुराधा	३१.०६	वृध्दि	२९.०७	बव	अहोरात्र	२२.३१ नं.वृश्चिक	०७.१६	१८.२५	४
२५	शनि	कृ.एकादशी	२०.३१	ज्येष्ठा	अहोरात्र	ध्रुव	२८.३७	बव	०८.०३	वृश्चिक	०७.१६	१८.२६	५
२६	रवि	कृ.द्वादशी	२०.५४	ज्येष्ठा	०८.२५	व्याघात	२७.३३	कौलव	०८.४८	वृश्चिक	०७.१६	१८.२६	६
२७	सोम	कृ.त्रयोदशी	२०.३४	मूळ	०९.०१	हर्षण	२५.५६	गर	०८.४१	०८.२५ नं.धनू	०७.१६	१८.२७	७
२८	मंगळ	कृ.चतुर्दशी	१९.३६	पूर्वाषाढा	०८.५८	वज्र	२३.५१	विष्टि	०८.०९	धनू	०७.१६	१८.२८	८
								चतुष्पाद	३०.५४				
२९	बुध	अमावास्या	१८.०५	उत्तराषाढा	०८.२०	सिध्दि	२१.२१	किंस्तुघ्न	२९.१०	१४.५१ नं.मकर	०७.१६	१८.२८	९
				श्रवण	३१.१४								
		माघ											
३०	गुरु	शु.प्रतिपदा	१६.११	धनिष्ठा	२९.५०	व्यतिपात	१८.३३	बालव	२७.०६	मकर	०७.१५	१८.२९	१०
३१	शुक्र	शु.द्वितीया	१३.५९	शततारका	२८.१४	वरियन	१५.३२	तैतिल	२४.४९	१८.३५ नं.कुंभ	०७.१५	१८.२९	११

दि.१ जानेवारी रोजी सूर्योदयी : रवि, चंद्र-धनू, मंगळ-कर्क, बुध-वृश्चिक, गुरु-वृषभ, शुक्र, शनि-कुंभ, हर्षल-मेष, नेपच्यून-मीन, प्लुटो-मकर राशीत राहील. दि.४ जानेवारी बुध-धनू, दि.१४ जानेवारी रवि-मकर, दि.२१ जानेवारी मंगळ-वृषभ(व), दि.२४ जानेवारी बुध-मकर, दि.२७ जानेवारी शुक्र-मीन राशीत प्रवेश करील.

पौष पौर्णिमा प्रारंभ- सोमवार दि.१३ जानेवारी पहाटे ५.०२, समाप्ती- सोमवार दि.१३ जानेवारी उत्तररात्री ३.५६

पौष अमावास्या प्रारंभ- मंगळवार दि.२८ जानेवारी रात्री ७.३६, समाप्ती- बुधवार दि.२९ जानेवारी सायं.६.०५

जानेवारी महिन्यातील तिथीविषयक माहिती येथे पहा

दि.७ **श्री तुळजाभवानीदेवी निद्राकाल समाप्त तुळजापूर**
यल्लमा यात्रा वज्रचौंडे ता.तासगाव
श्री शनीदेव उत्सव राक्षसभुवन (शनी) ता.गेवराई जि.बीड
दि.११ **लालबहादूर शास्त्री पुण्यदिन**
अण्णाबुवा कालगांवकर जयंती पुणे
यल्लमा यात्रा मतकुणकी ता.तासगाव
बेगमपूर उरूस ता.मोहोळ
श्री वरदायिनीदेवी यात्रा लाखवड ता.महाबळेश्वर
दि.१२ **राष्ट्रीय युवक दिन**
पारशी शेहरेवार मासारंभ
चंडीराम महाराज पुण्यतिथी खेड (राजगुरूनगर) जि.पुणे
वाग्देव महाराज रथोत्सव वाठार स्टेशन ता.कोरेगाव
येळापूर यात्रा ता.शिराळा जि.सांगली
विशाळगड उरूस प्रारंभ
दि.१३ **जिजामाता जयंती सिंदखेडराजा**
शाकंभरी व कालरात्री नवरात्र समाप्ती
वाग्देव महाराज पुण्यतिथी वाठार स्टेशन ता.कोरेगाव जि.सातारा
शाकंभरी उत्सव बदामीनगर सातारा
बाळुबाईदेवी यात्रा उंबर्डे ता.खटाव
निनाईदेवी यात्रा भुरकवाडी ता.खटाव
श्रृंगेरीदेवी यात्रा ब्रह्मगाव ता.आष्टी
उत्तवेश्वर यात्रा वाळणे गावडूस ता.महाबळेश्वर
श्री भैरवनाथ यात्रा कमान(चास) ता.राजगुरूनगर जि.पुणे
श्री थापलिंग यात्रा शिंगवे व नागापूर ता.आंबेगाव जि.पुणे
शेरखावलीबाबा यात्रा कानडगाव पो.निंभेरे ता.राहुरी जि.नगर
चंदूर यात्रा ता.हातकणंगले
नाथ यात्रा प्रा.खरसुंडी ता.आटपाडी
यल्लमा यात्रा बलगवडे ता.तासगाव
बंदेनवाज उरूस बावची ता.वाळवा
दावलमलिक उरूस शिवपुरी ता.वाळवा
रोकडाईदेवी यात्रा माळेगाव ता.माढा
श्री रवळनाथ यात्रा नाते ता.महाड
दि.१४ **भगवानबाबा पुण्यतिथी भगवानगड ता.पाथर्डी जि.नगर**
वीर जीवा महाला पुण्यदिन
बसवक्रांती दिन, प्रयाग स्नानारंभ
मार्लेश्वर यात्रा मारळ जि.रत्नागिरी
केशवबुवा पुरकर पु.ति.पारनेर
श्री सिध्दरामेश्वर यात्रा सोनलगी ता.जत व दुधणी ता.अक्कलकोट
दि.१५ श्री खंडोबा यात्रा वलखड ता.खानापूर जि.सांगली
गणेश यात्रा सिध्दापूर ता.मंगळवेढा
दि.१७ हजरत बाबासाहेब कादरी उरूस औज(मं) ता. द.सोलापूर
भुवनेश्वरी यात्रा शिरदवाड ता.शिरोळ
दि.२० लोटांगणे महाराज पुण्यतिथी ढेबेवाडी ता.पाटण जि.सातारा
श्री हरिदास महाराज पुण्यतिथी अस्वलेवाडी ता.शिराळा
दि.२६ यल्लमादेवी यात्रा वायफळे ता.तासगाव
दि.२९ **विशालतीर्थ यात्रा करवीर**
ब्रह्मदेव यात्रा(जैन) स्तवनिधी निपाणी
दावलमलिक यात्रा शेरा जि.लातूर
भैरवनाथ यात्रा तांबवे ता.माळशिरस
श्री खंडोबा यात्रा मैलापूर(नळदुर्ग) ता.तुळजापूर
दि.30 **पंचक सायं.६.३५ नंतर**
हुतात्मा दिन, कणकवली यात्रा
कलावतीदेवी समाधी उत्सव बेळगाव
बिरदेव यात्रा एकसंबा ता.चिकोडी
संगमेश्वर यात्रा हरिपूर जि.सांगली
पीर गैबीसाहेब उरूस मंगळवेढा
ह.वल्लीसो उरूस रामपूर पेठ किल्ले पन्हाळा
दि.३१ **राऊळ महाराज पुण्यदिन पिंगुळी ता.कुडाळ जि.सिंधुदुर्ग**
कुंतीमाता यात्रा कोथाळे ता.मोहोळ
धर्मनाथ बीजोत्सव-धानोरी ता. कोपरगाव, येतगाव ता.कडेगाव व कवठेमहांकाळ जि.सांगली, ब्रह्मगड (सोनेवाडी) ता.कोपरगाव जि.नगर

सर्वमंगल माङ्गल्ये शिवे सर्वार्थसाधिके । शरण्ये त्र्यंबके गौरि नारायणि नमोऽस्तु ते ।।

संस्थापक डी. एन. शिर्के यांचे सर्वाधिक लोकप्रिय प्रकाशन ।। श्री गुरुदेव दत्तात्रेय प्रसन्न ।। पुणे व सातारा आवृत्ती

।। श्री महालक्ष्मी प्रसन्न ।।

शास्त्रशुध्द संपूर्ण वार्षिक पंचांग

श्री महालक्ष्मी ®

सरस्वती पब्लिशिंग कंपनी प्रा.लि.,कोल्हापूर www.mahalaxmipanchang.com

२ फेब्रुवारी २०२५

माघ–फाल्गुन श्री शालिवाहन शके १९४६

विक्रम संवत् २०८१ शिवशक ३५१

सौर शिशिर–वसंत ऋतू दि.१८ सौर वसंत ऋतू प्रारंभ उत्तरायण

राहू काल

रविवार – सायं.४.३० ते ६.००
सोमवार – सकाळी ७.३० ते ९.००
मंगळवार – दुपारी ३.०० ते ४.३०
बुधवार – दुपारी १२.०० ते १.३०
गुरुवार – दुपारी १.३० ते ३.००
शुक्रवार – सकाळी १०.३० ते १२.००
शनिवार – सकाळी ९.०० ते १०.३०

गोव्यातील उत्सव

दि.१ गणेश जयंती उत्सव रुमडावाडा मुरगाव व बोगदा वास्को
दि.२ शांतादुर्गा रथोत्सव कवळे, मंडूर डोंगरी शिमगोत्सव प्रारंभ, सातेरीदेवी जत्रा मंगेश देवस्थान
दि.५ श्री सिमरेश्वर देवस्थान जत्रा हरमल ता.पेडणे
दि.६ सेरावली,पिलार व वेरणा फेस्त
दि.७ हनुमान जत्रा मळे–पणजी
दि.११ देव आजोबा जत्रा केरी–पेडणे
दि.१२ श्री मंगेश जत्रा मंगेशी
दि.१६ ते दि.२३ म्हार्दोळ जत्रा
दि.१७ आमोणे श्री महालक्ष्मी उत्सव
दि.१८ मंडूर डोंगरी शिमगोत्सव समाप्त
दि.२६ शिरोडे,रामनाथी सांखवाळ व तांबडी सुर्ल जत्रा, सप्तकोटीश्वर रथोत्सव नार्वे
दि.२८ कामाक्षीदेवी दिवजा जत्रा शिरोडे



दि.२६ महाशिवरात्री


वार				
रवि	माघ शु.४/५ उ.भाद्र. **२** वसंत श्री पंचमी संत तुकाराम महा.जन्मदिन देहू, विठ्ठल–रुक्मिणी विवाह सोहळा पंढरपूर व वाढे ता. जि.सातारा, श्री निष्णाईदेवी यात्रा पांगारे जि.पुणे मु.३	माघ शु.१२ आर्द्रा **९** गोंदवलेकर महाराज जयंती भीष्म द्वादशी, भगवानगिरी महा. भंडारा करंजवडे ता.वाळवा मायाक्कादेवी यात्रा ढालगाव ता.कवठेमहांकाळ मु.१०	माघ कृ.४ हस्त **१६** संकष्ट चतुर्थी चंद्रो.रा.९.४४ चित्रमहर्षी दादासाहेब फाळके पुण्यदिन, श्री चिंतामणी गणेश जन्मोत्सव दिन थेऊर ता.हवेली भैरवनाथ यात्रा वेलंग ता.वाई मु.१७	माघ कृ.१० मूळ **२३** संत गाडगेबाबा जयंती(तारीख) चिंतामणी म.पु.ति.आरग ता. मिरज, भैरवनाथ यात्रा मुदगड म्हस्कोबानाथ व जोगेश्वरीदेवी यात्रा गोपाळवाडी ता.दौंड मु.२४
सोम	माघ शु.६ रेवती **३** सूर्यषष्ठी,कुमार षष्ठी तिकोटेकर महा.जयंती विजापूर नरवीर उमाजी नाईक पुण्यदिन भिवरी ता.पुरंदर, श्री लक्ष्मीदेवी यात्रा मांजरी ता.चिकोडी पंचक रा.११.१६ पर्यंत मु.४	माघ शु.१३ पुनर्वसु **१०** सोमप्रदोष श्री विश्वकर्मा जयंती श्री भैरवनाथ जागर किसरुळे ता.पाटण, रघुनाथ महा.पु.ति. खटाव ता.तासगाव मु.११	माघ कृ.५ चित्रा **१७** औदुंबर पंचमी कालभैरव यात्रा पसरणी ता.वाई भैरवनाथ यात्रा शिरगाव ता.कराड क्रांति.वासुदेव बळवंत फडके पुण्यदिन, क्रांतिगुरू लहूजी साळवे पुण्यदिन पुणे मु.१८	माघ कृ.११ पूर्वाषाढा **२४** जागतिक मुद्रण दिन विजया एकादशी सिध्देश्वर यात्रा टोके मु.२५
मंगळ	माघ शु.७ अश्विनी **४** रथसप्तमी *जागतिक सूर्यनमस्कार दिन* नर्मदा जयंती,नरवीर तानाजी मालुसरे पुण्यदिन, गुरू मार्गी महर्षी नवल जयंती, कॅलेंडरकर्ते सदाशिव शिर्के पुण्यदिन मु.५	माघ शु.१४ पुष्य **११** पौर्णिमा सायं.६.५५ नंतर अंबाखेळतीदेवी यात्रा बोपोली ता.पाटण, श्रीनाथ म्हस्कोबा यात्रा प्रारंभ वीर ता.पुरंदर पारशी मेहेर मासारंभ मु.१२	माघ कृ.६ चित्रा **१८** रामकृष्ण जन्मोत्सव भालकी जि.बिदर, मीनायन दु.३.३६ *सौर वसंत ऋतू प्रारंभ* मु.१९	माघ कृ.१२ उत्तराषाढा **२५** *भौमप्रदोष* अवतार मेहेरबाबा जयंती मु.२६
बुध	माघ शु.८ भरणी **५** *दुर्गाष्टमी* भीष्माष्टमी, बुधाष्टमी मोहिनीराज सप्तदिन उत्सव प्रारंभ नेवासा खुर्द जि.नगर देव मानसिश्वर जत्रा वेंगुर्ला आलोरे उरूस ता.चिपळूण मु.६	माघ शु.१५ आश्लेषा **१२** संत रोहिदास जयंती पौर्णिमा रा.७.२२ प., कुलधर्म खंडोबा शिखरकाठी यात्रा जेजुरी वाघजाई यात्रा हिर्डोशी मावळ, भावेखोल,शिरवली ता.भोर मु.१३	माघ कृ.६ स्वाती **१९** छ.शिवाजी महा.जयंती देव रवळनाथ यात्रा चंदगड पूर्वेद्युः श्राद्ध, पीर गेसूदराज उरूस आमणापूर ता.पलूस शततारकार्कः दु.१२.२५ मु.२०	माघ कृ.१३ श्रवण **२६** महाशिवरात्री, निशिथकाल उ.रात्री १२.२७ ते उ.रा.१.१६ संत गाडगेबाबा जयंती(तिथी) स्वा.सावरकर पुण्यदिन पंचक उ.रात्री ४.३६ नं. मु.२७
गुरु	माघ शु.९ कृत्तिका **६** मध्वनवमी धनिष्ठार्कः स.७.४९ दासबोध जयंती शिवथरघळ चन्नवीर गुरू होटगी पु.ति.व आत्मज्योत होटगी ता.द.सोलापूर दत्त उत्सव माधवनगर सांगली केळकर महा.पु.ति.सांगली मु.७	माघ कृ.१ मघा **१३** गुरुप्रतिपदा गाणगापूर यात्रा,गुरुदेव शैल्य यात्रा गमन, केदारनाथ यात्रा केळोली ता.पाटण, भैरवनाथ यात्रा अपशिंगे(मि.)जि.सातारा संत निवृत्तीनाथ जयंती मु.१४	माघ कृ.७ विशाखा **२०** श्री गजानन महाराज प्रकट दिन शेगांव कालाष्टमी, अष्टका श्राध्द भार.फाल्गुन मासारंभ मु.२१	माघ कृ.१४/३० धनिष्ठा **२७** *द्वापार युगादी* मराठी भाषा गौरव दिन दर्श अमावास्या सकाळी ८.५४ ते उ.रात्री ६.१४ पर्यंत श्री वाघेश्वर यात्रा मांडवगण फराटा ता.शिरूर(पुणे) मु.२८
शुक्र	माघ शु.१० रोहिणी **७** भक्त पुंडलिक उत्सव पंढरपूर शंकरलिंग रथोत्सव संकेश्वर बिरदेव यात्रा प्रा.राशिवडे बु।। संतुबाईदेवी यात्रा कागवाड ता.अथणी, चाँद शिरदवाड उरूस ता.चिकोडी मु.८	माघ कृ.२ पूर्वा फाल्गुनी **१४** कालभैरव यात्रा गडहिंग्लज व रिळे जि.सांगली, भैरवनाथ यात्रा नुने ता.जि.सातारा गुरुनाथबाबा दंडवते जयंती पुणे *शब–ए–बरात* मु.१५	माघ कृ.८ अनुराधा **२१** जागतिक मातृभाषा दिन अंबाबाई यात्रा हुपरी व माद्याळ ता.कागल, कवठेपिरान उरूस (सप्तर्षी यात्रा) जि.सांगली अन्वष्टका श्राध्द मु.२२	फाल्गुन शु.१ शततारका **२८** राष्ट्रीय विज्ञान दिन गोकर्ण–महाबळेश्वर रथोत्सव महाकालीदेवी यात्रा कुंभार्ली ता.चिपळूण, संत निळोबाराय यात्रा प्रा.पिंपळनेर ता.पारनेर शाबान मु.२९
शनि	माघ शु.३ पू.भाद्रपदा **१** श्री गणेश जयंती विनायक,वरद,तिलकुंद चतुर्थी गणेश जयंती यात्रा वडूज ता. खटाव व होळसर्कल फलटण पालखी यात्रा मोरगाव जि.पुणे तटरक्षक दिन शाबान मु.२	माघ शु.११ मृग २ रा शनि **८** जया एकादशी माघी वारी यात्रा पंढरपूर कृष्णामाई उत्सव पाचवड ता.वाई लक्ष्मीनारायण उत्सव खटाव मौनी महाराज पु.ति.पाटगाव संत हरिबाबा पु.ति.फलटण मु.९	माघ कृ.३ उत्तरा फाल्गुनी **१५** संत नरहरी सोनार पु.ति. गुरू सेवालाल म.जयंती(बंजारा) जानुबाईदेवी यात्रा राजापूर ता. खटाव,लोकनाथस्वामी पु.ति.पुणे जननीदेवी यात्रा आपटी ता.भोर	माघ कृ.९ ज्येष्ठा ४ था शनि **२२** रामदास नवमी संत श्री मुक्ताबाई यात्रा मुक्ताईनगर, सज्जनगड यात्रा नरवीर तानाजी मालुसरे पु.ति. भैरवनाथ यात्रा करंजगाव(भोर) घाटजाई यात्रा पाचगणी मु.२३	वास्तू मुहूर्त दि.३,७,१०,१५,१७,२१ उपनयन मुहूर्त दि.३,७,१४ जावळ मुहूर्त दि.३,१०,१६,१७,२८

तिथीविषयक माहिती

दि.१ गणपतीपुळे यात्रा
विश्वनाथ महाराज रुकडीकर पुण्यतिथी
सरलष्कर मालोजी घोरपडे पुण्यदिन
विठ्ठल–रुक्मिणी वर्धापन दिन माळेवाडी ता.आटपाडी जि.सांगली
श्री गणेश माघी उत्सव हेदवी ता.गुहागर
दि.२ जननीमाता यात्रा विवर ता.महाबळेश्वर
घाडगेनाथ महाराज पु.ति.कोळे ता.कराड
मन्मथस्वामी जन्मोत्सव गाळदेव ता.जावली जि.सातारा व कपिलधार जि.बीड
नागनाथ यात्रा प्रारंभ नरंदे ता.हातकणंगले
दि.४ कृष्णावेणी उत्सवारंभ नृसिंहवाडी
श्री अंबाबाई यात्रा सांगोला जि.सोलापूर
सोमजाईदेवी यात्रा पऱ्हर बु।। ता.फलटण
राघवचैतन्य महा.रथ फडतरवाडी ता.खटाव
श्री सूर्यदेव यात्रा पट्टणकुडी ता.चिकोडी
दि.५ मधुकर पेडणेकर महाराज पुण्यतिथी सासवणे ता.अलिबाग
दि.८ समादेवी जयंती उत्सव प्रा.बेळगाव
दि.११ नवलाईदेवी यात्रा रासाटी ता.पाटण
सावळीरामबाबा पुण्यतिथी निंभेरे ता.राहुरी
श्री महासिध्द यात्रा मंडारकवठे जि.सोलापूर
दि.१२ माघ स्नान समाप्ती
कुंभ संक्रांती रात्री ९.५५
पुण्यकाल दु.१२.५३ ते सायं.६.३५ पर्यंत
श्री रेणुका यात्रा सौंदत्ती जि.बेळगाव
श्रीनाथ म्हस्कोबा लग्न–सोहळा वीर ता.पुरंदर
श्री लक्ष्मी–भैरवनाथ यात्रा यवत ता.दौंड
तुकाईदेवी यात्रा पारगाव सालु–मालु ता.दौंड
श्री भैरवनाथ यात्रा प्रारंभ मसूर ता.कराड
श्री वाग्जाईदेवी यात्रा गोषटवाडी ता.पाटण
श्री भैरवनाथ यात्रा वरुड ता.खटाव
श्री खंडोबा यात्रा काळज ता.फलटण
वाघजाईदेवी यात्रा आरडगाव ता.फलटण
श्री मोहिनीराज कुलधर्म कुलाचार नेवासा खुर्द ता.नेवासा जि.नगर
श्री होनाईदेवी यात्रा हातनूर ता.तासगाव
श्री रेणुका यात्रा जुळेवाडी ता.तासगाव
श्री अंबिकादेवी यात्रा वांगी ता.कडेगाव
सो.स.डोंगराईदेवी यात्रा(क्षत्रिय समाज) कडेपूर जि.सांगली
श्री कालभैरव यात्रा ताकारी ता.वाळवा
श्री महालक्ष्मी यात्रा पिलिव ता.माळशिरस
वज्रेश्वरीदेवी यात्रा तांबवे ता.माळशिरस
श्री भैरवनाथ यात्रा मेडद ता.माळशिरस
सय्यदवाडी उरूस पोफळी (चिपळूण)
मच्छिंद्रनाथ यात्रा मलंगगड(हाजि मलंग)
दि.१३ विष्णुबुवा जोग महाराज पुण्यतिथी क्षेत्र आळंदी देवाची व दारापूर अमरावती
श्री प्रभाकर महाराज पुण्यतिथी सोलापूर
श्री जान्हवीदेवी यात्रा एरंडोली ता.मिरज
श्री वाजुबाईदेवी यात्रा वाजेगाव ता.मिरज
श्री भैरवनाथ बगाड यात्रा केसे ता.कराड
दि.१४ ज्योतिर्लिंग यात्रा जळव ता.पाटण
दि.१६ कॅलेंडरकर्ते डी.एन.शिर्के पुण्यदिन
श्री मायाक्का यात्रा चिंचली जि.बेळगाव
श्री जोतिबा खेटे प्रारंभ कोल्हापूर
गोदड महाराज पुण्यतिथी कर्जत जि.नगर
श्री गोमाजी महा.पु.ति.नागझरी ता.शेगांव
आईसाहेब महाराज पायी दिंडी पालखी सोहळा किरकसाल ता.माण जि.सातारा
दि.१७ श्रीकृष्ण सरस्वती जयंती कोल्हापूर
मोहिनीराज यात्रा नेवासा खुर्द ता.नेवासा

यापुढील तिथीविषयक माहिती या महिन्याचे मागे पहा.

शुभ दिवस–दि.१ शुभ दिवस,दि.३,४ शुभ, दि.५ दुपारी १.३१ ते रात्री ८.३३ पर्यंत शुभ, दि.६ मध्यम, दि.७ सायं.४.१६ प.शुभ, दि.८ मध्यम, दि.९,१० शुभ, दि.११ सायं.६.५५ प.शुभ, दि.१२,१३,१४ शुभ, दि.१५ मध्यम, दि.१६,१७ शुभ दिवस, दि.१९ मध्यम दिवस, दि.२० दु.१.२९ नं.शुभ, दि.२१ दुपारी ३.५३ प.शुभ, दि.२२ मध्यम, दि.२३ दु.१.५५ नं. शुभ, दि.२४ मध्यम, दि.२५ सकाळी ८.१४ ते दुपारी १२.४७ प.शुभ, दि.२८ शुभ दिवस



त्याज्य दिवस–दि.२,१८,२७

भूमिपूजन मुहूर्त–दि.१,३,५,७,१०, १२,१३,१४,१५,२०,२१,२४

साखरपुडा मुहूर्त–दि.३,४,७,१४,१५, दि.१६,१७,२०,२१,२२,२३,२५

विवाह मुहूर्त–दि.३,४,७,१३,१६,१७, दि.२०,२१,२२,२३,२५

दि.१९ छ.शिवाजी महाराज जयंती

श्रीमहालक्ष्मी
info@mahalaxmipanchang.com
फेब्रुवारी २०२५
सरस्वती पब्लिशिंग कंपनी प्रा.लि.
१२१७/२, ए वॉर्ड, शिवाजी पेठ,
कोल्हापूर. फोन : ०२३१-२५३०३२५

आरोग्य किडनीचे...!

दरवर्षी मार्च महिन्यात 'जागतिक मूत्रपिंड दिन' साजरा केला जातो. सध्या मूत्रविकार व मूत्रपिंडाच्या समस्या यांचे प्रमाण वाढत चालले आहे. ह्रदयविकार, स्थूलपणा, रक्तदाब याविषयी समाजात जागृती वाढताना दिसते. मग मूत्रविकारांकडे दुर्लक्षित का? या जागतिक आरोग्य समस्येविषयी हा लेख...

सर्वसामान्य व्यक्तींना मूत्रपिंडांच्या आजाराविषयी फारशी माहिती नसते. ह्रदयविकाराच्या भीतीने आज सर्वजण इसीजी, २ डी इको, ॲन्जिओग्राफी या तपासण्या करत असतात, तेही बरोबर आहे. परंतु आपल्या शरीरातील ह्रदयाबरोबरच अजून एक महत्त्वाचे अवयव असते ते म्हणजे किडनी/मूत्रपिंड. मूत्रपिंडाच्या विकारांविषयी मात्र समाजामध्ये अजून जागृती दिसून येत नाही. एकीकडे ह्रदयविकार, स्थूलपणा, रक्तदाब याविषयी जागृती वाढत असताना मूत्रविकारांकडे दुर्लक्ष करण्याची अनास्थाच या परिस्थितीला कारणीभूत ठरत आहे. आज मूत्रपिंड/मूत्रविकारांमुळे संपूर्ण डायलेसिस/मूत्रपिंडरोपणाची आवश्यकता असणाऱ्या रुग्णांची संख्या ७.८ दशलक्ष पर्यंत आहे. यावरून या विकाराची गंभीरता लक्षात येते.

निसर्गाने आपल्याला मूत्रपिंड हा जीवनाला अत्यावश्यक असा अवयव दिला आहे. शरीरात घडणाऱ्या व जीवनाला आवश्यक चयापचयाच्या क्रिया सतत घडत असतात. त्यामध्ये शरीराला आवश्यक असणारी पोषण द्रव्ये, त्याचबरोबर निरनिराळे अनावश्यक घटक निर्माण होत असतात. विशेषतः आम्ल, क्षार व निरनिराळे विषारी घटक निर्माण होतात. याचे व शरीरातील पाण्याचे संतुलन मूत्राद्वारे नियंत्रित करण्याचे काम मूत्रपिंड करतात. या कार्यात मूत्रपिंडाचे विकार बाधा आणतात. आणि प्रसंगी ते आजार जीवघेणेही ठरतात.

किडनीचे आजार होण्याची अनेक कारणे असतात. यामध्ये मूत्रपिंडाला येणारी सूज त्याला 'नेफ्रीटीस' (Nephritis) म्हटले जाते. मधुमेह, मूत्रपिंडांमधील जन्मजात वैगुण्ये, उच्च रक्तदाब अशी कारणेही या विकारांमागे दिसून येतात. याशिवाय, मूतखडा, मूत्रमार्गातील वहन क्रियेत निर्माण होणारे अडथळे (अरुंद मूत्रमार्ग नलिका), प्रोस्टेटच्या अडचणी याचाही समावेश होतो.

किडनीचा आजार झाला आहे हे कसे ओळखावे?– कुशीमध्ये वेदना होणे, मूत्राद्वारे रक्त जाणे किंवा लघवी धुरकट होणे, ताप येणे, अचानक रक्तदाब वाढणे, मूत्रविसर्जनाच्या क्रियेत अडथळा येणे अशी लक्षणे आपल्याला याविषयी जागरूक करतात. परंतु काही वेळा सुरुवातीची लक्षणे एकत्र दिसत नाहीत किंवा ओळखता येत नाहीत. थोड्या कामानेही थकून जाणे, झोपेचे चक्र बिघडणे अशी अजून काही लक्षणे दिसू शकतात. पण ही लक्षणे मूत्रपिंडाच्या आजाराचीच असतात असे लक्षात येत नाही. दगदग झाली असेल, अतिकामाचा ताण आला असेल असे वाटून या लक्षणांकडे हमखास दुर्लक्ष केले जाते. पण रात्री झोपल्यानंतरही उठून लघवीला जावे लागणे, चेहऱ्यावर सूज येणे, सकाळी उठल्यावर पायांवर सूज दिसणे, तरुणपणीही रक्तदाब जास्त आणि हिमोग्लोबिन कमी असणे, अशी लक्षणे किडनीच्या आजारांशी जोडता येऊ शकतात. येथे एक प्रश्न उद्भवतो की, रात्री झोपल्यानंतर लघवीला जावे लागणे हे सदासर्वदा चुकीचेच समजावे का? मूत्राचे संचयन करणे हे किडनीचे प्रमुख काम आहे. किडनीच्या आजारात किडनीच्या या मूळ स्वभावावर परिणाम होऊन व्यक्तीला अधिक विरहित (डायल्युटेड) मूत्रप्रवृत्ती होते. तुलनेने अधिक वेळा लघवीला जावे लागते. ही बाब दिवसा कामाच्या व्यापात व्यक्तीच्या लक्षात न येणे शक्य आहे. पण रात्री झोपल्यानंतर दोन ते चार वेळा लघवीला जावे लागत असेल आणि शरीरस्वभावात हा बदल अचानकच दिसत असेल, तर त्याचा संबंध किडनीच्या आजाराशी असू शकतो. यामध्ये आणखी एक गोष्ट लक्षात घेतली पाहिजे की, रात्री झोपताना पाणी, कॉफी, चहा असे द्रवपदार्थांचे मोठ्या प्रमाणात सेवन केलेले असेल तर झोपेतून एखाद्या वेळी लघवीसाठी उठावे लागते आणि ते योग्यच आहे. पण तसे नसतानाही झोपेतून दोन-चार वेळा उठावे लागत असेल तर वैद्यकीय सल्ला घेणेच उचित ठरेल. वयस्कर व्यक्तींमध्ये रात्री मूत्रप्रवृत्ती होण्याचे लक्षण प्रोस्टेट ग्रंथीच्या अनावश्यक वाढीच्या आजारातही दिसते. तसेच मधुमेहाच्या रुग्णांमध्येही हे लक्षण दिसून येते. तेव्हा अशा वेळी इतर आजारांच्या शक्यतेचीही खातरजमा करणे आवश्यक आहे. मात्र डायल्युटेड मूत्रप्रवृत्तीचा संबंध किडनीशी असतो हे लक्षात ठेवावे.

किडनी आजारांची अधिक शक्यता कोणाला? जागरूक कसे राहावे?– उच्च रक्तदाब, मधुमेह, कर्करोग, यकृताचा आजार, मूत्रसंसर्ग, मूतखडा, मूत्रमार्गातील अडथळा, संधिवात अशा आजारांच्या रुग्णांना किडनीचे आजार होण्याचा संभव अधिक असतो. त्यामुळे या रुग्णांनी त्यांच्या किडनीच्या कार्याबद्दल जागरूक राहणे आवश्यक आहे.

तुमची किडनी योग्य रितीने कार्य करते आहे का हे जाणून घेण्यासाठी डॉक्टरांच्या सल्ल्याने ठरावीक काळात रक्त आणि लघवीच्या तपासण्या करून घेणे इष्ट असते. अनेकदा रुग्णांना वाटते की, किडनीच्या तपासणीसाठी अल्ट्रासाऊंड म्हणजे सोनोग्राफीची तपासणी पुरेशी आहे. पण अल्ट्रासाऊंड तपासणीत किडनीची रचना दिसते, तिचे कार्य नव्हे. अल्ट्रासाऊंडमध्ये किडनी अगदी सुस्थितीत दिसत असूनही तिच्या कार्यात बिघाड झालेला असू शकतो. त्यामुळे किडनीच्या कार्याची माहिती घेण्यासाठी रक्त आणि लघवीच्या तपासण्या हाच सोपा पर्याय आहे. आता चाळीस ते पंचेचाळीस वयाच्या वरील व्यक्तींमध्ये ठरावीक काळाने रक्तातील साखर, रक्तदाब, कोलेस्टेरॉल तपासून घ्यायची जागरूकता वाढते आहे. याचबरोबर रक्तातील युरिया आणि क्रिएटिनीन या घटकांची पातळीही तपासून पाहणे गरजेचे आहे. तसेच 'युरिन रूटीन' या तपासणीतून लघवीत उतरणाऱ्या प्रथिनांविषयी माहिती मिळते. किडनीचे कार्य योग्य रितीने चालले आहे की नाही एवढे समजून घ्यायला या तपासण्या प्राथमिक पातळीवर पुरेशा आहेत.

किडनीची काळजी घेण्यासाठी दहा महत्त्वपूर्ण टिप्स

रोज पुरेसे पाणी प्या– पुरेसे पाणी नियमित प्यायल्याने शरीरात पाण्याचे प्रमाण योग्य राहते व विषारी घटक शरीराबाहेर टाकण्यासही मदत होते. पाण्यामुळे शरीरातील रक्त योग्य प्रकारे प्रवाहित राहते, तसेच पचनक्रिया व शरीराचे तापमान योग्य राखण्यासही पाणी सहाय्यकारी ठरते. म्हणूनच दीड ते दोन लिटर पाणी दिवसभरात पिणे आवश्यक आहे. अधिक काटेकोर सांगायचे तर साधारणतः तुम्हाला जेवढी लघवी होते, त्याहून अर्धा लिटर पाणी अधिक प्या.

योग्य आहार घ्या– तुम्ही काय आहार घेता यावर तुमचे आरोग्य अवलंबून असते. फास्टफूड, जंकफूडसारखे अपायकारी अन्नपदार्थ अधिक प्रमाणात व वारंवार खाल्ल्यास त्याचा दुष्परिणाम किडनीवर निश्चितच दिसून येतो. म्हणूनच योग्य व सकस आहार निवडा. आहारात कलिंगड, संत्रे, लिंबू यांसारखी फळे आणि शतावरी, लसूण, मासे यांचा समावेश असावा. रोजचा दिवस लिंबाचा रस घातलेले कोमट पाणी पिऊन सुरू झाला तर तुमच्या किडनीचे आरोग्य सुधारण्यास खूप मदत होईल.

मूत्राचा आवेग रोखू नका– रक्त गाळून त्यातील टाकाऊ घटक शरीराबाहेर टाकण्याचे काम किडनी करीत असते. शरीरातील टाकाऊ घटक व अतिरिक्त पाणी मूत्राशयात साठून राहतात. अंदाजे दीडशे ते दोनशे मिलिलिटर मूत्र मूत्राशयात साचल्यानंतर लघवीची इच्छा निर्माण होते. अशा वेळेस लघवी अडवून ठेवू नका. लघवीचा आवेग वारंवार रोखल्याचा ताण मूत्राशयावर येऊन रक्त गाळण्याच्या प्रक्रियेत बिघाड होऊ शकतो.

आरोग्यदायी पेयांचे सेवन– फळांचा ताजा रस घेणे हे किडनीचे आरोग्य सुधारण्याचा व शरीरात अधिकाधिक द्रव्याचा समावेश करण्याचा एक सोपा मार्ग आहे. यामुळे पचनसंस्थेला अधिकाधिक पाणी मिळेल व त्यामुळे टाकाऊ घटक शरीराबाहेर टाकण्यास मदत होईल. चहा व कॉफी घेणे टाळा. यातील कॅफिनमुळे शरीरातील द्रवाचे प्रमाण कमी होते. जर तुम्हाला किडनीविकार असेल, तर बीट व पालक या भाज्यांचा रस घेणे टाळा. या भाज्यांमुळे ऑक्झेलिक या आम्लाची निर्मिती वाढते व त्यामुळे मूतखडा होण्याची शक्यता अधिक असते. आणि हो, तुम्ही शहाळ्याचे पाणी अवश्य पिऊ शकता.

मीठ अतिप्रमाणात खाऊ नका– मिठाच्या सेवनाने शरीरात सोडियमचे प्रमाण वाढते. सोडियम वाढल्यामुळे रक्तदाबाची समस्या वाढतेच, पण त्यासोबतच मूतखडा होण्याचाही संभव अधिक असतो.

योग्य व नियमित व्यायाम करा– लठ्ठपणाचा थेट परिणाम किडनीवर होत असल्याचे आता सिध्द झाले आहे. वजन नियंत्रणात नसल्यास किडनीविकार होण्याची शक्यता दुपटीने वाढते. योग्य व्यायाम, आहार व नियंत्रणात असलेले वजन यांमुळे किडनीचे आरोग्य सुधारण्यास मदत होते. तसेच नियमित व्यायाम केल्याने तुम्ही प्रसन्न राहता.

मधुमेह, उच्च रक्तदाब व ह्रदयरोग काबूत ठेवा– मधुमेह, उच्च रक्तदाब व ह्रदयरोग यांसारख्या आजारांतून किडनीविकार बळावण्याची शक्यता अधिक असते. म्हणूनच योग्य आहार, व्यायाम व योगसाधनेने तुम्ही रक्तातील साखर, कोलेस्टेरॉल व रक्तदाब नियंत्रणात ठेवण्याचा प्रयत्न करा. म्हणजे आपोआपच किडनीविकार दूर राहण्यास मदत होईल.

डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय औषधे घेणे टाळा– तुम्ही घेतलेले कोणतेही औषध किडनीतून गाळले जाते. जर तुम्ही स्वतःच औषधांची मात्रा वाढवलीत किंवा डॉक्टरांच्या सल्ल्याशिवाय अन्य औषधे घेतलीत तर त्यातील विषारी घटकांचा भार किडनीवर पडतो. म्हणूनच डॉक्टरांच्या सल्ल्यानुसारच औषधे घ्या व स्वतःच स्वतःची औषधे ठरवणे टाळा.

पूरक (सप्लिमेंट) व हर्बल औषधे घेण्यापूर्वी विचार करा– जर तुम्ही पूरक (सप्लिमेंट्स) व्हिटॅमिन किंवा हर्बल औषधे घेत असाल तर त्याच्याही मात्रांचा जरूर विचार करा. अतिरिक्त प्रमाणात घेतलेले व्हिटॅमिन व काही वनस्पतींच्या अर्कांचा किडनीवर विपरीत परिणाम होतो. म्हणूनच अशी औषधे घेण्यापूर्वी डॉक्टरांचा सल्ला जरूर घ्या.

धूम्रपान व मद्यपान टाळा– अतिरिक्त प्रमाणात मद्यपान केल्यास शरीरात किडनीचे कार्य सुरळीत करणाऱ्या संप्रेरकांवर (हार्मोनवर) दुष्परिणाम होतो. धूम्रपानामुळे थेट किडनीवर परिणाम होत नसला तरीही त्यामुळे ह्रदयरोग बळावण्याची शक्यता अधिक असते व त्याचा अप्रत्यक्ष परिणाम किडनीच्या कार्यावर होतो.

प्रा. डॉ. सुरेश पाटणकर,
वरिष्ठ मूत्रविकारतज्ञ (युरॉलॉजिस्ट)
एस हॉस्पिटल, एरंडवणे, पुणे.
फोन : ०२०-६७०२९१००, ८९५६६६१६३९

फेब्रुवारी महिन्यातील तिथीविषयक माहिती येथे पहा

दि.१७ श्री दत्त कवीश्वर महाराज जयंती
गजाननबाप्पा म.पु.ति.करकंब ता.पंढरपूर
श्रीनाथ मस्कोबा यात्रा कावळवाडी ता.करमाळा
दि.२० श्री उज्जैनगिरी महाराज पुण्यतिथी सप्ताह प्रारंभ सोमेवाडी ता.सांगोला
लाडलेशा पीर उरूस कुपवाड ता.मिरज
दि.२२ मायाक्का यात्रा सावर्डे ता.तासगाव
देवी करंजेश्वरी वाढदिवस गोवळकोट-पेठमाप ता.चिपळूण
दि.२६ पंडिताराध्य विश्वाराध्य जयंती
संत गुलाबबाबा यात्रा मौजे रेडा ता.इंदापूर
कांगुरमलदेवी उत्सव शिरवली ता.भोर जि.पुणे
वेदप्रणित रेडा समाधी उत्सव आळे ता.जुन्नर
मारुती यात्रा किणी ता.हातकणंगले
दि.२६ महाशिवरात्री यात्रा खालील ठिकाणी
कुणकेश्वर यात्रा देवगड, रामतीर्थ यात्रा आजरा, बामणोली ता.मिरज, गोटखिंडी ता.वाळवा, चकदेव-वाघवळे व तारळे जि.सातारा, चिंचोली ता.शिराळा, कणेरीमठ ता.करवीर, लाटवडे ता.हातकणंगले, कुसरुंड ता.पाटण, नागाचे कुमठे ता.खटाव, मसले-चौधरी व सारोळे ता.मोहोळ, माळकवठे ता.द. सोलापूर, माचणूर ता.मंगळवेढा, चांडगाव ता.श्रीगोंदा, धामणसे व गुहागर जि.रत्नागिरी, हरिहरेश्वर व जीवना यात्रा श्रीवर्धन
दि.२७ माणकेश्वर यात्रा सुरूल जि.सांगली
राम यात्रा करगणी ता.आटपाडी जि.सांगली
नागनाथ यात्रा नागाव-कवठे ता.तासगाव
श्रीराम रथोत्सव चिंचणी(वांगी) ता.कडेगाव
श्री बाळसिध्द यात्रा घोगाव ता.कराड
श्री निनाईदेवी यात्रा उमरकांचन ता.पाटण
कात्रेश्वर रथोत्सव कातरखटाव ता.खटाव
पानलिंग पालखी कावड वावरहिरे ता.माण
शिवानंदस्वामी परभणीकर पु.ति.सोलापूर
भगवान आदिनाथ वार्षिक मस्तकाभिषेक नांदणी ता.शिरोळ, कुरुंदवाड यात्रा,
सिध्देश्वर यात्रा लिंपणगाव ता.श्रीगोंदा
श्री बसवेश्वर यात्रा डिग्रज ता.मिरज
देव रामेश्वर रथोत्सव आकेरी ता.कुडाळ
दि.२८ सिध्देश्वर यात्रा शिवपुरी ता.वाळवा

संकष्ट चतुर्थी
चंद्रोदय दि.१६ फेब्रुवारी

				बारामती	०९.३९	रत्नागिरी	०९.४७	मार्गाव	०९.४२	बेंगलोर	०९.२४	बिदर	०९.२७
				सातारा	०९.४३	चिपळूण	०९.४३	फोंडा	०९.४२	बेळगाव	०९.४२	कारवार	०९.४२
				कराड	०९.४३	राजापूर	०९.४३	पणजी	०९.४२	बागलकोट	०९.३४	हुबळी	०९.३७
मुंबई	०९.४९	पनवेल	०९.४८	कोल्हापूर	०९.४३	दापोली	०९.४७	छ.संभाजीनगर	०९.४०	गोकाक	०९.३८	धारवाड	०९.३७
ठाणे	०९.४८	पालघर	०९.४८	सांगली	०९.३९	सावंतवाडी	०९.४२	अहमदनगर	०९.४०	निपाणी	०९.४२	म्हैसूर	०९.२८
कल्याण	०९.४८	नाशिक	०९.४४	सोलापूर	०९.३५	कणकवली	०९.४२	धाराशिव	०९.३५	अथणी	०९.३९	हैद्राबाद	०९.२६
डोंबिवली	०९.४८	महाड	०९.४७	पंढरपूर	०९.३९	वेंगुर्ला	०९.४२	लातूर	०९.३१	मुधोळ	०९.३८	दिल्ली	०९.३७
अलिबाग	०९.४८	पुणे	०९.४४	मंगळवेढा	०९.३९	म्हापसा	०९.४२	नागपूर	०९.२४	विजयपूर	०९.३४	बडोदा	०९.४९

राशिभविष्य : फेब्रुवारी २०२५

मेष – यश मिळेल. मोबदला मिळेल. विवाह जुळेल. बढती मिळेल. कर्ज फेडा. शिक्षणात आघाडी घ्याल. कायदेशीर बाबींना सामोरे जावे लागेल. अनाकलनीय खर्च उद्भवेल. महिना उत्तमरित्या जाईल. विपरीत घटनेतून लाभ संभवतो. **चंद्रबल–** ९, १०, १५, १६, १७

वृषभ – कर्माला भाग्याची जोड लाभेल. विवाह जुळल्यास सुंदर स्थळ मिळेल. अपेक्षेप्रमाणे अनेक लाभ होतील. प्रलोभने टाळा. उत्तरार्धात मानसन्मान होईल. घरापासून दूर जाण्याचे योग येतील. विवाह जुळेल. साहित्य, लेखनात प्रगती राहील. **चंद्रबल–** ६, ७, ८, ११, १२

मिथुन – पूर्वार्ध धंदा-नोकरीस प्रतिकूल राहील. उत्तरार्धात सामाजिक कार्यात सहभाग वाढेल. बुध्दिकौशल्य व मुत्सद्दीपणा उपयोगी येईल. परदेशगमनाची संधी लाभेल. क्रोध आवरा. पोटाची तक्रार जाणवेल. कायदेशीर बाबी सांभाळा. **चंद्रबल–** ९, १०, १३, १४, १५

कर्क – कामासाठी प्रवास घडेल. अहम्‌पणा, भावनिक वाद वाढेल. उत्तरार्धात धंद्यात मंदी जाणवेल. शारीरिक दगदग वाढेल. शैक्षणिक प्रगती होत राहील. विवाह जुळेल. खर्च वाढेल. परदेशगमन घडेल. कौटुंबिक वाद उद्भवतील. **चंद्रबल–** ६, ७, ११, १२, १६, १७

सिंह – संधी ओळखा. उत्तरार्धात भावनेवर नियंत्रण ठेवा. वैवाहिक जीवनात विरोधीप्रेम राहील. अचानक धनलाभ होतील. शारीरिक तक्रार जाणवेल. प्रॉपर्टीचे लाभ होतील. कामाची गुणवत्ता वाढवा. कर्माला भाग्याची साथ मिळेल. **चंद्रबल–** ७, ८ ,९, १०, १३, १४

कन्या – संततीची उधळपट्टी चालेल. उत्तरार्धात एखादी संधी चालून येईल. भावनिक वादळे निर्माण होऊ देऊ नका. गैरसमज होतील. विवाह जुळेल. शैक्षणिक प्रगती राहील. यात्रा, परदेशगमन घडेल. कामात प्रयत्न कमी पडतील. **चंद्रबल–** ९, १०, ११, १२, १६, १७

तूळ – घरगृहस्थीची चिंता राहील. सर्व बाजूने गळचेपी होईल. भावनिक कटुता जाणवेल. शारीरिक तक्रारींकडे दुर्लक्ष करू नका. आग्रही रहाल. अपेक्षित प्रसिध्दी मिळणार नाही. आध्यात्मिकता वाढेल. विवाह जुळेल. गैरसमज होतील. **चंद्रबल–** ११, १२, १३, १४, १७

वृश्चिक – कामात नवीन उपाययोजना कराल. यश मिळेल. उत्तरार्धात नावलौकिक वाढेल. घरगृहस्थीची काळजी राहील. महिलांना प्रसूतीसमयी त्रास संभवतो. विवाह जुळेल. शारीरिक दगदग वाढेल. कर्माला भाग्याची साथ मिळेल. **चंद्रबल–** ७, ८, १३, १४, १५, १६, १७

धनू – उत्तरार्धात आर्थिक प्राप्ती सुधारेल. नवीन उपाययोजना कराल. स्वतःला सिध्द कराल. घरगृहस्थीत व नातेवाइकांच्यात गैरसमज होतील. धंद्यात सतर्क रहा. कौटुंबिक खर्च वाढेल. विद्यार्थ्यासंगी रहाल. पित्ताचा त्रास होईल. **चंद्रबल–** ७, ८, ९, १०, १४, १५

मकर – पित्ताचा त्रास होईल. प्रकृती नरमगरम राहील. आर्थिक प्राप्ती जेमतेम राहील. भावंडांशी वाद टाळा. खोटे दस्तऐवज करू नका. आर्थिक स्थिती सुधारत राहील. शैक्षणिक प्रगती होईल. विवाह जुळेल. क्रोध आवरा. धार्मिक कृत्ये कराल. **चंद्रबल–** ९, १०, ११, १२

कुंभ – पूर्वार्ध मोठ्या खर्चाचा राहील. महत्त्वाकांक्षी रहाल. उत्तरार्धात रागावर नियंत्रण ठेवा. इस्टेटीचे वाद निर्माण होतील. निर्णायक कामात यश मिळेल. विलंब, अडचणी त्रास अनुभवाल. इतरांना दुखवू नका. कायदेशीर बाबी सांभाळा. **चंद्रबल–** ११, १२, १३, १४

मीन – आर्थिक लाभ होतील. उत्तरार्धात मोठे खर्च, संघर्षाला तोंड द्यावे लागेल. जवळच्या व्यक्तींचा विरह जाणवेल. विवाह जुळेल. पोटाची तक्रार राहील. प्रॉपर्टीची कामे होतील. विपरीत घटनेतून लाभ संभवतो. भाऊबंदकी जाणवेल. **चंद्रबल–** ७, ८, १३, १४, १५, १६, १७

पंचांग
(मुंबई वेळेप्रमाणे)
फेब्रुवारी २०२५ — श्री शालिवाहन शके १९४६
माघ-फाल्गुन — विक्रम संवत् २०८१

ता.	वार	तिथी	ता.मि. पर्यंत	नक्षत्र	ता.मि. पर्यंत	योग	ता.मि. पर्यंत	करण	ता.मि. पर्यंत	चंद्रराशी	सूर्योदय	सूर्यास्त	मा.सौर दिनांक
फेब्रुवारी		माघ											माघ
०१	शनि	शु.तृतीया	११.३८	पू.भाद्रपदा	२६.३२	परिघ	१२.२४	वणिज	२२.२६	कुंभ	०७.१५	१८.३०	१२
०२	रवि	शु.चतुर्थी	०९.१४	उ.भाद्रपदा	२४.५२	शिव	०९.१३	बव	२०.०३	२०.५८ नं.मीन	०७.१४	१८.३०	१३
		शु.पंचमी	३०.५२			सिध्द	३०.०५						
०३	सोम	शु.षष्ठी	२८.३७	रेवती	२३.१६	साध्य	२७.०२	कौलव	१७.४४	मीन	०७.१४	१८.३१	१४
०४	मंगळ	शु.सप्तमी	२६.३०	अश्विनी	२१.४९	शुभ	२४.०५	गर	१५.३२	२३.१६ नं.मेष	०७.१४	१८.३१	१५
०५	बुध	शु.अष्टमी	२४.३५	भरणी	२०.३२	शुक्ल	२१.१८	विष्टि	१३.३१	मेष	०७.१३	१८.३२	१६
०६	गुरु	शु.नवमी	२२.५३	कृत्तिका	१९.२९	ब्रह्म	१८.४१	बालव	११.४२	२६.१५ नं.वृषभ	०७.१३	१८.३३	१७
०७	शुक्र	शु.दशमी	२१.२६	रोहिणी	१८.३१	ऐंद्र	१६.१६	तैतिल	१०.०७	वृषभ	०७.१३	१८.३३	१८
०८	शनि	शु.एकादशी	२०.१६	मृग	१८.०६	वैधृति	१४.०३	वणिज	०८.४८	३०.२० नं.मिथुन	०७.१२	१८.३४	१९
०९	रवि	शु.द्वादशी	१९.२५	आर्द्रा	१७.५२	विष्कंभ	१२.०६	बव	०७.४८	मिथुन	०७.१२	१८.३४	२०
								कौलव	३१.०८				
१०	सोम	शु.त्रयोदशी	१८.५७	पुनर्वसु	१८.००	प्रीति	१०.२६	गर	३०.१२	मिथुन	०७.११	१८.३५	२१
